कब्जा पावती

Exh. C

कब्जा घेणार :- अध्यक्ष, महाराष्ट्र महिला उद्यम ट्रस्ट
तर्फे सचिव. दिलीपसिंग दादाभाई सोलंकी

कब्जा देणार :- डी. राख असवले
मंडल अधिकारी थेरगांव ता. मुळशी.

मौजे जांबे ता. मुळशी जि. पुणे येथील गायरान जमिन सर्व्हे नंबर १४१ पैकी ११हे.९३ आर जमिनी पैकी क्षेत्र ७ हे. ९३ आर जमिनीच्या चतुःसिमा खालील प्रमाणे आहेत.

पुर्वेस :- स.नं. ७५ व ७८ ची शिव.

दक्षिणेस :- स.नं. १२९ ची शिव

पश्चिमेस :- रस्ता व लगत स.नं. १३७ ते १४० पर्यंतचीशिव

उत्तरेस :- स.नं. १४१ पैकी उर्वरित क्षेत्र.

येणे प्रमाणे चतुःसिमा पूर्वक जमिनीमधील रस्त्याचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र ७ हे. ९३ आर जमीन मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील आदेश क्रमांक पमअ/सीआर/२४/२००९ दिनांक २३/११/२००९ अन्वये जागेवर समक्ष कब्जा दिला व घेतला आहे. त्याप्रमाणे कब्जेपावती लिहून दिली व घेतली. ती मान्य आहे. कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. सदर जागेमध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही.

दिनांक ०१/०५/२०१०

कब्जा देणार
मंडल अधिकारी थेरगांव
ता. मुळशी जि. पुणे.

कब्जा घेणार
(श्री दिलीपसिंग दा. सोलंकी)

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २६/८/२००९

विषय : <u>जमीन - पुणे</u>
मौजे जांबे ता. मुळशी येथील जागा शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजूर करण्याबाबत. महाराष्ट्र महिला उद्यम् ट्रस्ट यांची मागणी.

संदर्भ : १) आयुक्त पुणे यांचे पत्र क्र मह/२/जमीन/पुणे/सीआर/५८८४, दिनांक २०/१२/२००८, दि. १७/६/२००९ व दि. २२/६/२००९
२) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. पमअ/कावि/८४३/२००९, दि. १७/६/२००९
३) शासन परिपत्रक क्र. एलआरएफ १०८३/७११३४/प्रक्र ३४७८/ग-६, दि. ८/२/१९८३
४) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. जमीन एलआरएफ १००२/प्रक्र ८७/ज-१, दि. ३०/६/१९९२
५) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ५, ६ व ७

<u>ज्ञापन :-</u>

उपरोक्त विषयासंबंधीच्या आयुक्त पुणे / जिल्हाधिकारी पुणे यांच्या अनुक्रमे संदर्भ क्रमांक (१) व (२) येथील प्रस्तावाला अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, मौजे जांबे ता. मुळशी येथील सर्वे नं. १४१ मधील ११ हे. ९३ आर क्षेत्राची महाराष्ट्र महिला उद्यम् ट्रस्ट या संस्थेने शैक्षणिक प्रयोजनासाठी मागणी केली आहे. त्याअनुषंगाने सर्वे नं. १२९ लगतचे सर्वे नं. १४१ मधील ७ हेक्टर ९३ आर क्षेत्र खालील प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (स.ज.वि.) नियम १९७१ मधील नियम ५, ६ व ७ तसेच शासन परिपत्रक दि. ८/२/१९८३ व शासन निर्णय दि. ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | क्षेत्र चौ.मी. मीटर |
|---|---|---|
| १ | प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, व वसतीगृह | २७,३०० |
| २ | महाविद्यालयासाठी | २०,००० |
| ४ | क्रीडांगणासाठी | ३२,००० |
| | एकूण क्षेत्र | ७९,३०० |

कृ.मा.प...

प्राथमिक, माध्यमिक विद्यालय व वसतीगृह यासाठीचे २६,३०० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल (सं.ज.वि.) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ नुसार महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने व क्रीडांगणासाठीचे ३२००० चौ.मी. क्षेत्र सदर नियमातील नियम ७ व शासन निर्णय दि. २६/२/२००१ मधील तरतुदीनुसार नाममात्र रु. १/- इतके वार्षिक भाडे आकारुन ३० वर्षाकरीता भाडेपट्टा आकारुन तसेच महाविद्यालयासाठीचे २०,००० चौ.मी. क्षेत्र शासन निर्णय दि. ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार मंजूरी आदेशाच्या लगतपुर्व पाच वर्ष आधीच्या एक जानेवारी रोजी असलेल्या किंमतीच्या २५% इतकी रक्कम संस्थेकडून आकारण्यात यावी. सदर क्षेत्र मंजूर करताना संस्थेस खालील विशिष्ठ अटी तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी शर्ती बंधनकारक राहतील.

<u>अटी :-</u>

(१) रस्ता रुंदीकरणाने बाधित क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र निर्गत करण्यात यावे.

(२) उर्वरित क्षेत्रावर प्रादेशिक योजना पुणे मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत संस्थेस निव्वळ भूखंड क्षेत्राचे २०% च.क्ष.नि. मर्यादेत तळ + मजल्याचे शैक्षणिक वापराचे बांधकाम, ४०० झाडे प्रति हेक्टर वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील.

(३) एकूण क्षेत्राच्या ४०% क्षेत्र क्रीडांगणासाठी सलग आणि सुयोग्य आकाराचे क्षेत्र राखीव ठेवणे बंधनकारक राहील.

(४) शाळेस / संस्थेस जमिनीचे हस्तांतरण शासनाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

(५) सदर जमिनीचा वापर शैक्षणिकदृष्ट्या करण्यात यावा, व्यापारीदृष्टीकोनातुन करता येणार नाही.

(६) मंजूर करण्यात आलेली जमीन अर्जदार भोगवटादार वर्ग-२ / भाडेपट्टेदार म्हणून धारण करील व शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत / गहाण / तारण करणार नाही.

(७) जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनासाठीच करण्यात यावा. अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय वापर करता येणार नाही.

(८) मंजूर करण्यात आलेल्या जमिनीवर बांधकाम करताना स्थानिक विकास नियमावलीनुसार व स्थानिक प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीनंतर बांधकाम करण्यात यावे. तथापि विकास नियंत्रण नियमावलीत काहीही तरतूद असली तरी असे बांधकाम फक्त, ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली आहे, अशा प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

पुढे पहा ...

[illegible]

(१०) जिल्हाधिकारी, पुणे यांनी जमीन मंजुरीचे आदेश काढण्यापूर्वी शासनाच्या अटी व शर्ती तसेच शासनाद्वारे निर्धारीत करण्यात येणारी किंमत भरण्यास तयार असल्याबाबत अर्जदाराकडून लेखी अभिप्रमाणित हमीपत्र घ्यावे. तसेच जमिनीचा ताबा देतांना विहित नमुन्यातील सनद / भाडेपट्टा निष्पादित करण्याची कार्यवाही करावी.

२. हे ज्ञापन शालेय शिक्षण विभाग, नगर विकास विभाग, ग्रामविकास विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३११/व्यय-९, दि. २१/८/२००९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(जे.पी. डांगे)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.

प्रति,

आयुक्त,पुणे विभाग, पुणे.

प्रतिलिपी :-

१) जिल्हाधिकारी, पुणे (कागदपत्रांची संचिकेसह ) (डाक नोंद पोच देय)
२) नगरविकास विभाग, (कार्यासन- नवि -१३), मंत्रालय, मुंबई.
३) शालेय शिक्षण विभाग (कार्यासन माशि ३), मंत्रालय, मुंबई
४) ग्रामविकास विभाग (कार्यासन पंरा ६), मंत्रालय, मुंबई
५) तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, ता. मुळशी , जि. पुणे
६) तहसीलदार मुळशी , ता. मुळशी, जि. पुणे
७) महालेखापाल - १/२, महाराष्ट्र राज्य, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
८) महालेखापाल - १/२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
९) वित्त विभाग, (व्यय-९), मंत्रालय, मुंबई.
१०) उपसचिव (ज-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
११) निवडनस्ती, ज-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

वाचा :- १) अध्यक्ष महाराष्ट्र महिला उद्यम ट्रस्ट रा. प्लॉट नं. २४, स. नं. २७०/१/३२, पल्लोड फार्म, बाणेर रोड, पुणे ४११ ०४५ यांचा दिनांक १९/१२/२००६ रोजीचा अर्ज.

२) तहसिलदार मुळशी यांचेकडिल अहवाल क्रमांक जमीन/कावि/१०५०/२००८ दिनांक २७/१०/२००८ त्यासोबतचे चौकशीचे कागदपत्रे

३) सहाय्यक संचालक नगर रचना, पुणे यांचेकडिल जा.क्र. जमीन मागणी/मौजे जांबे/ता. मुळशी/स.नं. १४१/ससंपु/५१६४ दिनांक ७/११/२००८

४) शासन परिपत्रक क्रमांक एलआरएफ १०८३/७११३४/प्र.क्र.३४७८/ग-६ दिनांक ८/२/१९८३

५) शासन निर्णय क्रमांक एलआरएफ १०९२/प्र.क्र. ८७/ज-१ दि. ३०/६/१९९२

६) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ५, ६ व ७

८) शासन ज्ञापन पत्र क्रमांक जमीन ३४०९/२०९८/प्र.क्र.पु. १०७२/ज-५ दिनांक २६/८/२००९

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसुल शाखा
क्रमांक पमअ/सीआर/२४/२००९
पुणे १ दिनांक २३ /११/२००९

विषय :- जमीन-पुणे
मौजे जांबे ता. मुळशी जि. पुणे येथील
जमीन सर्व्हे नंबर १४१ मधील ७ हे. ९३ आर क्षेत्र
शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजुर करणेबाबत.
महाराष्ट्र महिला उद्यम ट्रस्ट यांची मागणी

## आदेश,

मौजे जांबे ता. मुळशी जि. पुणे येथिल जमीन सर्व्हे नंबर १४१ मधील ११ हे. ९३ आर क्षेत्र शैक्षणिक प्रयोजनासाठी मिळणेबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र महिला उद्यम ट्रस्ट रा. प्लॉट नं. २४ स. नं. २७०/१/३२, पल्लोड फार्म, बाणेर रोड पुणे ४११ ०४५ यांनी विनंती अर्ज केलेला होता.

सदर अर्जाची चौकशी तहसिलदार मुळशी यांचे मार्फत करणेत आली असून सदरची जागा देणेबाबत शिफारस केलेली आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना पुणे यांनी दिनांक ७/११/२००८ अन्वये मंजुर प्रादेशिक. योजना पुणे मधील. भु वापर. प्रस्तावानुसार विषयाधिन जमीन मौजे जांबे ता. मुळशी स. नं. १४१ ही शेती ना विकास विभागात समाविष्ट आहे. सदर जागा मौजे जांबे ते मौजे नेरे या ग्रामीण मार्गावर सन्मुख आहे. प्रादेशिक योजना मधील तरतुदीनुसार विषयाधिन जमिनीमध्ये नोंदणीकृत संस्थेस निव्वळ भुखंड क्षेत्राचे २० टक्के चटई क्षेत्र निर्देशकांचे मर्यादेत तळ +१ मजल्याचे बांधकाम शैक्षणिक वापरासाठी अनुज्ञेय होत असले शिफारस केलेली आहे.

शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडिल ज्ञापन क्रमांक जमीन ३४०९/२०९८/प्र.क्र.पु १०७२/ज-५ दिनांक २६/८/२००९ अन्वये मौजे जांबे ता. मुळशी येथील सर्व्हे नंबर १४१ मधील ११ हे. ९३ आर क्षेत्राची महाराष्ट्र उद्यम ट्रस्ट या संस्थेने शैक्षणिक प्रयोजनासाठी मागणी केली आहे. त्याअनुषंगाने सर्व्हे नंबर १२९ लगतचे सर्व्हे नंबर १४१ मधील ७ हे. ९३ आर क्षेत्र खालील प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (स.ज.वि.) नियम १९७१ मधील ५, ६ व ७ तसेच शासन परिपत्रक दिनांक ८/२/१९८३ व शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | प्राथमिक व माध्यमिक विदयालय, व वसतीगृह | २७३००.०० |
| २ | महाविदयालयासाठी | २००००.०० |
| ३ | क्रिडांगणासाठी | ३२०००.०० |
| | एकुण क्षेत्र | ७९३००.०० |

प्राथमिक माध्यमिक विदयालय व वसतीगृह यासाठीचे २७३००.०० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल (रा.ज.वि.) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ नुसार महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने व क्रिडांगणासाठीचे ३२०००.०० चौ.मी. क्षेत्र सदर नियमातील नियम ७ व शासन निर्णय दिनांक २७/२/२००९ मधील तरतुदीनुसार नाममात्र रु. १/- इतके वार्षिक भाडे आकारुन ३० वर्षाकरिता भाडेपट्टा आकारुन तसेच महाविदयालयासाठीचे २००००.०० चौ.मी. क्षेत्र शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार मंजुरी आदेशाच्या लगतपुर्व पाच वर्ष आधीच्या एक जानेवारी रोजी असलेल्या किंमतीच्या २५ टक्के इतकी रक्कम संस्थेकडून आकारण्यात यावी. सदर क्षेत्र मंजुर करताना संस्थेस खालील विशिष्ट अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

मौजे जांबे ता. मुळशी जि. पुणे येथिल जमीन सर्व्हे नंबर १४१ मधील संस्थेस मंजुर करण्यात आलेल्या ७ हे. ९३ आर क्षेत्रापैकी २००००.०० चौ.मी. क्षेत्रास जागा प्रदान

आदेशाच्या लगतपुर्व पाच वर्षाच्या अधिच्या १ जानेवारी रोजी म्हणजेच सन २००३ चे मुल्यांकन रुपये २६,८९,३००/- इतके होत आहे. सदर रक्कमेच्या २५ टक्के रक्कम रुपये ६,७२,३२५/- होत आहे. त्याचप्रमाणे क्रिडांगणासाठी ३,२०००.०० चौ.मी. क्षेत्रासाठी नाममात्र रुपये १/- इतके वार्षिक भाडे प्रमाणे संस्थेने ३० वर्षाकरिता रक्कम रुपये ३०/- अशी एकुण रक्कम रुपये ६,७२,३५५/- संस्थेने दिनांक २१/११/२००९ रोजी चलनाने सरकारी तिजोरीत जमा केली आहे.

सबब, महाराष्ट्र जमीन महसुल (शासकीय जमिनीची निर्गती) नियम १९७१ मधील नियम ५, ६ व ७ नुसार मला प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन मी चंद्रकांत दळवी जिल्हाधिकारी, पुणे मौजे जांबे ता. मुळशी जि. पुणे येथिल जमीन सर्व्हे नंबर १२९ लगतचे सर्व्हे नंबर १४१ मधील ७ हेक्टर ९३ आर क्षेत्र संस्थेस शैक्षणिक या प्रयोजनासाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून प्रदान करीत आहे.

अटी व शर्ती

१. मंजुर जागेचा प्रदान आदेश महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्या अंतर्गतचे नियमावलीतील तरतुदीस अधीन राहतील.
२. मंजुर करण्यात आलेल्या जमिनीवर बांधकाम करताना स्थानिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार व स्थानिक प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीनंतर बांधकाम करण्यात यावे. तथापि स्थानिक विकास नियंत्रण नियमावलीतील काहीही तरतुद असली तरी असे बांधकाम ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजुर करण्यात आली आहे अशा प्रयोजनासाठीच करण्यात येईल.
३. संस्थेने संबंधित सक्षम प्राधिकरणाची मान्यता एक वर्षाचे आत घ्यावी.
४. रस्ता रुंदीकरणाने बाधित क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र निर्गत करण्यात यावे.
५. उर्वरित क्षेत्रावर प्रादेशिक योजना पुणे मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत संस्थेस निव्वळ भूखंड क्षेत्राचे २० टक्के च.क्ष.नि. मर्यादेत तळ +मजल्याचे शैक्षणिक वापराचे बांधकाम, ४०० झाडे प्रति हेक्टर वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील.
६. एकुण क्षेत्राच्या ४० टक्के क्षेत्र क्रिडांगणासाठी सलग आणि सुयोग्य आकारचे क्षेत्र राखीव ठेवणे बंधनकारक राहील.
७. सदर जमिनीचा वापर शैक्षणिकदृष्टया करण्यात यावा. व्यापारीदृष्टीकोनातुन करता येणार नाही.
८. मंजुर करण्यात आलेली जमीन अर्जदार भोगवटादार वर्ग-२/भाडेपट्टेदार म्हणून धारण करील व शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत/गहाण/तारण करणार नाही.

९. जमिनीचा वापर मंजुर प्रयोजनासाठीच करण्यात यावा. अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय वापर करता येणार नाही.

१०. उपरोक्त अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास मंजुर केलेली जागा परत शासनाकडे घेणेस व जागा मंजुरी आदेश रद्द होणेस पात्र राहील. त्याबाबत संस्थेस मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

११. संसथेमध्ये जाती, धर्म लिंगभेद न करता सर्वांसाठी प्रवेश खुला राहील.

१२. संस्था आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याचे आत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार विहीत नमुन्यात सनद करुन घेईल.

सही/-(चंद्रकांत दळवी)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र महिला उद्यम ट्रस्ट
रा. प्लॉट नं. २४, स. नं. २७०/१/३६
पल्लोड फार्म नं. १, बाणेर रोड,
पुणे ४११ ०४५.

जिल्हाधिकारी कार्यालय
सत्यमेव जयते
पुणे

प्रत :- मा. अवर सचिव महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई ४०० ०३२ यांजकडेस माहितीस्तव सविनय सादर

प्रत :- मा. आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

प्रत :- उपविभागीय अधिकारी मावळ उपविभाग पुणे यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रत :- तहसिलदार मुळशी यांचेकडे कागदपत्रासह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

२/- प्रस्तुतचे कामी अट क्रमांक १३ मध्ये सुचित केलेप्रमाणे प्रतिग्रहिता यांचेकडुन प्रथमतः लेखी अभिप्रमाणित हमीपत्र घेणेत यावे व तद्नंतरच मौजे जांबे ता. मुळशी येथील जमीन सर्व्हे नंबर १२९ लगतचे सर्व्हे नंबर १४१ मधील ७ हे. ९३ आर क्षेत्राचा ताबा प्रतिग्रहिता यास द्यावा तसेच ताबा पावती, पंचनामा व मोजणी नकाशासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- तालुका निरीक्षक भुमी अभिलेख मुळशी यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/ विषयांकित जागेची नियमानुसार तात्काळ मोजणी करुन देणेत यावी.

जिल्हाधिकारी पुणे करिता